॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव. दि. १५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागात माजी विद्यार्थी मेळावा आणि पालक सभा आयोजित करण्यात आली होती त्याला माजी विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ. मनिषा इंदाणी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील होते. प्रमुख वक्ता म्हणून पुण्याच्या कॅम्प्युटर इंजिनिअर प्रतिमा जोशी होत्या. त्यांनी अध्ययन अध्यापनात आय.सी.टी चा उपयोग, व्हर्च्युअल रिऑलिटी, आर्टिफिशल इन्टीलिजन्स, गुगल क्लासरुम यावर विद्यार्थ्यांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला खुप चांगला प्रतिसाद दिला.

विभागातर्फे २०१५ नंतर सेट-नेट उत्तीर्ण आणि पीएच.डी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचा कुलगुरू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आजी विद्यार्थ्यांच्या पालकांचे देखील स्वागत या प्रसंगी करण्यात आले. गुणवत्तापूर्ण शिक्षक-शिक्षणाची गरज आज समाजाला आहे, असा सूर या माजी विद्यार्थी मेळाव्यात निघाला. माजी विद्यार्थी संभाजी जमदाडे, पुनम जमदाडे, चेतन मोरे, सीमा बारी, उमेश भोसले, गुंजाळ किशोर, कविता भास्कर, सपना पाटील, भावना पाटील आदींनी आपल्या मनोगतात विभागाने केलेल्या संस्काराचा, शिक्षणाचा आम्हाला आमच्या जीवनात पदोपदी उपयोग होत आहे, असे मत व्यक्त केले.

विभागाच्या आजी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. पुनम म्हसाणे या विद्यार्थीनीने `गंगुचे लग्न` हे एकपात्री प्रयोग सादर केला. तर महेश कचरे याने ` स्वगत` तर शिल्पा उबाले हिने `स्वरचीत कविता` सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कचरे आणि ज्ञानेश्वर पाटील या एम.एड च्या विद्यार्थ्यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ.सीमा बारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. संतोष खिराडे आणि उमेश भोसले यांनी काम केले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १५ एप्रिल,२०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी